महाराष्ट्र शासन

क्र.कौविउ-२०२०/प्र.क्र.४६/अभियान-१

सुजाता सौनिक
अ.मु.स.कौ.वि.व उ.वि.

विषय :- महाराष्ट्र राज्य स्टार्टअप वीक-२०२० साजरा करणेबाबत.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र शासनाने कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाच्या अंतर्गत "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्ट अप धोरण २०१८" धोरण जाहीर केले होते. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि स्टार्टअप ईकोसिस्टीमच्या अध्ययन आणि विकासनासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे. **सोसायटीच्या मुख्य उद्देश्यांमध्ये महाराष्ट्रामध्ये अनुकूल व्यावसायिक वातावरण निर्मिती करून नवकल्पनांना प्रोत्साहन देणे, रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी स्टार्टअप्सना सक्षम करणे व नियामक रचना सुलभ करणे इत्यादींचा समावेश आहे.**

२. या उद्देश्यांच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीतर्फे विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविलेले जातात. "महाराष्ट्र स्टार्ट अप वीक" हा यापैकीच एक महत्वपूर्ण उपक्रम आहे. स्टार्टअप्स चे नाविन्यपूर्ण उत्पादने /सेवा यांचे प्रकल्प शासकीय यंत्रणेत राबवून नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून प्रगती करणे हे महाराष्ट्र स्टार्टअप्स वीकचे मुख्य उद्दिष्ट आहे. या स्टाॅअप्स वीकमध्ये शिक्षण, कौशल्य विकास, आरोग्यसुविधा, शाश्वतता (स्वच्छ ऊर्जा, पाणी, कचरा व्यवस्थापन इत्यादी) प्रशासन आणि इतर क्षेत्रांतील स्टार्टअप्स यात सहभागी होऊ शकतात. या वीक करीता संपूर्ण भारतातील, उद्योग आणि अंतर्गत व्यापार संवर्धन विभाग, भारत सरकार (DPIIT) मान्यता प्राप्त स्टार्टअप्स अर्ज करू शकतात.

३. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीतर्फे महाराष्ट्र स्टार्टअप वीक आजवर दोनदा यशस्वीपणे संपन्न झाला. यावर्षी देखील स्टार्टअप इकोसिस्टीमला प्रोत्साहन देण्यासाठी आणि सक्षम करण्यासाठी स्टार्टअप सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. पहिल्या आणि दुसऱ्या स्टार्टअप सप्ताहातील विजेत्या स्टार्टअप्सनी राष्ट्रीय आरोग्य मिशन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महावितरण, ग्रामविकास विभाग, विविध महानगरपालिका, जिल्हा कार्यालये अशा विविध शासकीय संस्था/विभागांसोबत काम पूर्ण केले आहे.

४. या स्टार्टअप्स वीकमध्ये सहभागी होण्यासाठी व अर्ज करण्यासाठी इच्छुक स्टार्टअप्स www.msins.in/startup-week या संकेतस्थळाला भेट देऊ शकतात. तसेच या संबंधी अधिक माहिती हवी असल्यास team@msins.in या ईमेल वर अथवा नाविन्यता सोसायटीचे श्री. अमित कोठावदे (०२२-३५५४३०९९) यांच्याशी संपर्क साधू शकतात.

५. सदर योजनेची माहिती जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आपल्या स्तरावरून योग्य त्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात, ही नम्र विनंती.

आपली,

१४/२/२०२०

(सुजाता सौनिक)
अपर मुख्य सचिव,
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

प्रति,
सर्व सचिव/ प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव
मंत्रालय, मुंबई

Scanned with CamScanner